॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २३ : संशोधनातील नाविन्यपूर्ण कल्पना, तंत्रज्ञान, पेटंट आणि प्रोटोटाइप यांचे व्यावसायिकीकरण करून त्यांचे यशस्वी स्टार्टअप्स, उद्योग आणि समाजोपयोगी उत्पादनांमध्ये रूपांतर घडवून आणण्याच्या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस तर्फे "रिसर्च टू कमर्शियलायझेशन" या विशेष इन्क्युबेशन कार्यक्रमासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या कार्यक्रमासाठी देशभरातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, संशोधक, पीएच.डी. व पदव्युत्तर संशोधक, विद्यार्थी, पेटंट धारक, संशोधन गट तसेच प्रारंभिक टप्प्यातील तंत्रज्ञानाधारित स्टार्टअप्स अर्ज करू शकणार आहेत. संशोधनातील उत्कृष्ट कल्पना प्रयोगशाळा किंवा संशोधन प्रबंधापुरत्या मर्यादित न राहता त्यांचे उद्योग, स्टार्टअप आणि व्यावसायिक उत्पादनांमध्ये रूपांतर व्हावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत सहभागी संशोधकांना तज्ज्ञ मार्गदर्शन, उत्पादन विकास, तंत्रज्ञान व बाजारपेठ पडताळणी, व्यवसाय मॉडेल विकसित करणे, आर्थिक नियोजन, बौद्धिक संपदा (IP) व्यवस्थापन, निधी व गुंतवणूक मिळविण्यासाठी तयारी, तसेच उद्योग, गुंतवणूकदार आणि विविध इकोसिस्टम भागीदारांशी नेटवर्किंगची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय इन्क्युबेशन सुविधा आणि आवश्यक व्यवसाय सहाय्यही प्रदान करण्यात येणार आहे.

देशातील कोणत्याही विद्यापीठ, महाविद्यालय, संशोधन संस्था, उद्योग, स्टार्टअप किंवा स्वतंत्र संशोधकांसाठी हा कार्यक्रम खुला असून संशोधनाधारित उद्योजकता, तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि आत्मनिर्भर भारत या राष्ट्रीय उद्दिष्टांना चालना देणारा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे.

इच्छुकांनी https://kciil-kbcnmu.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा. अर्ज करण्याची अंतिम तारीख १६ ऑगस्ट २०२६ असून केसीआयआयएल तर्फे देशभरातील संशोधक, नवोपक्रमक, प्राध्यापक, शास्त्रज्ञ आणि संशोधनाधारित उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २३ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता